PEOPLE'S EDUCATION SOCIETY'S

**ADV. BALASAHEB APTE COLLEGE OF LAW**

Prin. N.M.Kale Marg, Off Gokhale Road(S), Dadar (W), Mumbai- 400 028.

Contact No.-8356829964, Email: abacollegeoflaw@gmail.com

**Date: 24th September, 2021**

# NOTICE

## TRANSFER ADMISSION 2021-22
## T.Y.B.L.S./LL.B. (5 Years Law Course)

**Reference: - Director, Higher Education, Pune Circular No. विधी ३८२१/प्र.क्र.५४४/सीईटीसेल/१०५०१ दि. २३/०९/२०२१**

Students aspiring to take transfer admission in **T.Y.B.L.S. /LL.B. (5 Years Law Course) 2021-22** are informed to read the referenced circular carefully. Only 2 seats are available for Transfer of Admission in T.Y.B.L.S./LL.B. (5 Yrs Law Course). Interested students should apply in prescribed form (Annexure-A). It is available on the College Website.

Students aspiring for transfer admission do not need to come to the college to submit application or documents. Students are also informed to email Annexure-A and required documents to **abacollegeoflaw@gmail.com** only. Incomplete Annexure-A and documents will not be considered. Students should submit **Annexure-A** via Email from **24/09/2021 to 29/09/2021** along with following documents.

1. Photocopies of Mark Sheets of All Lower examinations.
2. No Objection Certificate from the previous Institution.
3. Interim Eligibility Certificate issued by Mumbai University (Students belongs to other than Mumbai University)
4. In case the candidates are awarded Grades / CGPA instead of marks, the Conversion Grades / CGPA to percentage of marks would be based on the Formula / procedure certified by the University / Institution who has awarded same. It is obligatory on the part of the candidate to submit the conversion Certificate / transcript from the University / Institution.
5. Gap Certificate (if applicable)

**Important: -** All the documents must be clearly scanned and emailed. Photographs of documents shall not be entertained.

**Vaishali Gurav**
IN-CHARGE PRINCIPAL
ADV. BALASAHEB APTE COLLEGE OF LAW

A.B.A. COLLEGE OF LAW
Dadar (W), Mumbai-28.

**महाराष्ट्र शासन**

**शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)**

**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१.**

फोन नं. ०२०/२६०५१५१२ Web:www.dhepune.gov.in E-mail : law.dhepune@nic.in

क्र. विधी- ३८२१/प्र.क्र. ५४४ /सीईटीसेल/१०५०१ दिनांक : २३ सप्टेंबर, २०२१

**परिपत्रक -**

**विषय : केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारे विधी ३ आणि ५ वर्षीय अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता पहिल्या वर्षानंतर संस्था / महाविद्यालय बदल करण्याबाबत.**

वाचा : १. सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २८
२. शासन अधिसूचना क्र. टीईएम - २०१९/प्र.क्र.४१/तांशि-४, दि. ०४.०६.२०१९
३. शासन अधिसूचना क्र. सीईटी-२०१५/प्र.क्र.२४३(भाग-२)/मशि-२, दि.५.५.२०१७
४. शासन निर्णय क्र. सीईटी-२०१७/प्र.क्र.१२४/मशि-२, दिनांक १२.०५.२०१७.
५. शासन निर्णय क्र. विधी-२०१९/प्र.क्र.१३०/मशि-२, दिनांक ०९.१०.२०२०

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील विधी ३ व ५ वर्षीय पदवी अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेचे नियम दिनांक ०५.०५.२०१७ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्र ( असाधारण भाग चार-ब) अन्वये प्रसिध्द करण्यात आले आहेत. सदर अधिसूचनेतील नियम क्रमांक १६ अन्वये पहिल्या वर्षानंतर पाठ्यक्रम किंवा संस्था बदलाबाबत पुढीलप्रमाणे तरतूद करण्यात आलेली आहे. ती पुढीलप्रमाणे -

(१) पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या, किंवा चौथ्या वर्षानंतर उमेदवारांचा बदल पुढील पध्दतीने करण्यात येईल.

(क) पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या किंवा चौथ्या वर्षात एकदा प्रवेश घेतलेला उमेदवार त्याच शैक्षणिक वर्षात इतर कोणतीही संस्था बदलून मागण्यास पात्र असणार नाही;

(ख) पहिले वर्ष ( पहिल्या आणि दुसऱ्या सत्रामध्ये ) किंवा दुसरे वर्ष ( तिसऱ्या आणि चौथ्या सत्रामध्ये ) किंवा तिसरे वर्ष ( पाचव्या आणि सहाव्या सत्रामध्ये ) किंवा चौथे वर्ष ( सातव्या आणि आठव्या सत्रामध्ये) परीक्षा सर्व विषयांमध्ये उत्तीर्ण असणारा किंवा उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक असलेल्या विषयांपैकी एका विषयात अनुत्तीर्ण असलेला उमेदवार, संस्था किंवा अभ्यासक्रम बदलून घेण्यास पात्र असल्याचे समजण्यात येईल.

परंतू, दुसऱ्या वर्षानंतर संस्था किंवा अभ्यासक्रम बदलण्यासाठी उमेदवाराने पहिले वर्ष उत्तीर्ण केलेले असले पाहिजे आणि तिसऱ्या वर्षानंतर बदली करण्यासाठी

उमेदवाराने पहिले आणि दुसरे वर्ष उत्तीर्ण असला पाहिजेआणि चौथ्या वर्षानंतर बदली करण्यासाठी उमेदवार पहिले, दुसरे आणि तिसरे वर्ष उत्तीर्ण असावा.

(ग) विनाअनुदानित संस्थेतील विद्यार्थ्यांना कोणत्याही परिस्थितीत शासकीय किंवा शासकीय अनुदानित संस्था, विद्यापीठ विभाग, विद्यापीठ संचलित संस्था कोणत्याही टप्प्यावर बदलून घेता येणार नाही. तथापि, शासकीय किंवा शासकीय अनुदानित, विद्यापीठ विभाग, विद्यापीठ संचलित महाविद्यालयातील उमेदवाराला, विनाअनुदानित शैक्षणिक संस्थेमध्ये बदल करुन देण्याची मागणी करता येईल.

(घ) विद्यार्थी कोणत्याही टप्प्यावर स्वायत्त शैक्षणिक संस्थेमध्ये बदली होऊन जाऊ शकत नाही.

(ङ) विनाअनुदानित संस्थेमध्ये बदलून जाणे :- विनाअनुदानित संस्थांचे प्राचार्य हे उच्च शिक्षण संचालनालयाच्या पूर्व मान्यतेने, संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र, संबंधित विद्यापीठाचे पात्रता प्रमाणपत्र व रिक्त जागाची स्थिती सादर केल्यावर बदल करुन घेण्याच्या मागणीसाठी इतर संस्थांमधील उमेदवारांचा विचार करतील. उमेदवार जो पाठ्यक्रम बदलून घेत आहे, त्या पाठ्यक्रमासाठी संबंधित विद्यापीठाने निर्धारीत केल्याप्रमाणे, उमेदवारांच्या पात्रतेची सुनिश्चिती संस्थेचे प्राचार्य करतील.

(च) संस्थेच्या / महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या शिफारशी शिवाय उच्च शिक्षण संचालनालयाकडून कोणताही अर्ज दाखल करुन घेतला जाणार नाही.

(२) अधिसंख्य जागेतील कोट्यावर प्रवेश घेतलेल्या उमेदवारांना संस्था बदलून घेता येणार नाही.

शासन अधिसूचना दिनांक ०५.०५.२०१७ अन्वये प्रथम वर्षानंतर संस्था / महाविद्यालय बदलाची कार्यवाही करण्यासाठी संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांना प्राधिकृत केलेले आहे. तसेच शासन निर्णय दिनांक १२.०५.२०१७ अन्वये, राजपत्राद्वारे प्रवेशासाठी अधिसूचित केलेल्या अर्हता व शर्ती, तसेच प्रवेश प्रक्रियेचे नियम, शासकीय/ अशासकीय अनुदानित/ विनाअनुदानित विधी पदवी अभ्यासक्रम व राज्यातील अकृषि विद्यापीठांमधील व विद्यापीठ संचलित शैक्षणिक संस्थांमधील विधी पदवी अभ्यासक्रमांना लागू करण्यात आले आहेत. सदरहू तरतुदींच्या आधारे विधी ३ व ५ वर्षीय अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या संस्था / महाविद्यालय बदल करण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात येत आहे.

i. विनाअनुदानित संस्थेतील/ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना विनाअनुदानित संस्थेमध्ये / महाविद्यालयामध्ये पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या वर्षानंतर (अभ्यासक्रमनिहाय लागू) महाविद्यालय बदलाची विनंती करता येईल.

ii. शासकीय / शासन अनुदानित / विद्यापीठ व्यवस्थापित अनुदानित संस्था महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शासकीय / शासन अनुदानित / विद्यापीठ व्यवस्थापित अनुदानित संस्था / विना अनुदानित संस्था / महाविद्यालयामध्ये पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या वर्षानंतर (अभ्यासक्रमनिहाय लागू) महाविद्यालय बदलाची विनंती करता येईल.

iii. विद्यार्थ्यांना एका महाविद्यालयामध्ये बदलीबाबतचा अर्ज करण्यास मुभा देण्यात येत असून, एकापेक्षा अधिक महाविद्यालयांमध्ये बदली करण्यासाठी अर्ज करणारा विद्यार्थी महाविद्यालय बदल करण्यासाठी अपात्र ठरविला जाईल. सबब, अर्ज करतेवेळी विद्यार्थ्यांने संबंधित महाविद्यालयातील रिक्त जागा विचारात घेवून अर्ज करावा.

iv. उक्त नमूद i. व ii. मध्ये नमूद बाबींच्या अधिन राहून प्रथम/द्वितीय/तृतीय/चतुर्थ वर्षाचा अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर संस्था बदल करण्याची विनंती करणाऱ्या उमेदवाराला, जागांच्या उपलब्धतेच्या अधिन राहून दुसऱ्या संस्थेत / महाविद्यालयामध्ये बदल करण्यासाठी परवानगी देण्यात येईल आणि हे बदल १ (ख) मध्ये नमूद तरतुदीच्या आधारे करण्यात येतील.

v. विद्यार्थ्यांना ज्या महाविद्यालयामध्ये बदलीने प्रवेश घ्यावयाचा आहे (Aspiring Institute) त्या संस्थेत/ महाविद्यालयाकडे ईमेलद्वारे सोबतच्या Annexure - A मधील विहित नमुन्यातील विनंती अर्ज, सध्या शिक्षण घेत असलेल्या महाविद्यालयाचे ना-हरकत प्रमाणपत्र, शिक्षणात खंड असल्यास, त्याबाबत प्राचार्याचे प्रमाणपत्र किंवा रु. १००/- च्या स्टँप पेपरवर प्रतिज्ञापत्र, महाविद्यालय बदलीच्या कारणाच्या पृष्ठर्थ पुरावे इ. दस्ताऐवजासह जमा करावा. विद्यापीठ बदल असल्यास पुर्वीच्या विद्यापीठातील विषय व सद्यस्थितीच्या विद्यापीठातील विषय समकक्ष असलेबाबतची खातरजमा करण्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयाच्या / संस्थेच्या प्राचार्यांची असेल.

vi. विद्यार्थ्यांनी ज्या संस्थेमध्ये /महाविद्यालयात महाविद्यालय बदलासाठी विनंती केली आहे त्या संस्थेच्या/ महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी त्यांचेकडे प्राप्त विनंती अर्जामध्ये नमूद माहितीची, त्यासोबतच्या कागदपत्रांच्या आधारे तपासणी करावी, त्रूटी आढळून आल्यास/ गुणपत्रक किंवा ना-हरकत प्रमाणपत्र जोडलेले नसल्यास त्याबाबत संबंधित विद्यार्थ्यांना ईमेलद्वारे कळविण्यात यावे. विद्यार्थ्यांच्या अर्जामधील माहितीच्या व दस्तऐवजांच्या आधारे यासोबतच्या Annexure B & C मध्ये अचूक माहिती सादर करावी. तसेच अर्जामध्ये गुणांऐवजी श्रेणी / श्रेयांक नमूद असल्यास सदर श्रेणी / श्रेयांकाचे संपूर्ण गुणांमध्ये अथवा टक्क्यांमध्ये रुपांतरित करुन गुण / टक्के नमूद करावेत.

vii. संस्था बदलासाठी विद्यार्थ्यांनी ज्या संस्थेसाठी / महाविद्यालयासाठी विनंती केलेली आहे त्या संस्थेच्या / महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी याबाबतच्या प्रस्तावावर कार्यवाही ही सोबत जोडलेल्या कालमर्यादेत होईल याची खबरदारी घ्यावी व आवश्यक तो पाठपुरावा करावा. तसेच यासाठी विद्यार्थी किंवा पालक यांना या कार्यालयात व्यक्तीश: पाठविल्यास त्याची दखल घेतली जाणार नाही.

viii. **महाविद्यालयांनी त्यांचे स्तरावर प्राप्त अर्जाची पडताळणी करावी, पडताळणी करतेवेळी विद्यार्थ्याचा विहित नमून्यातील अर्ज, पुर्वीच्या महाविद्यालयाचे ना-हरकत प्रमाणपत्र, प्रथम / द्वितीय /तृतीय / चतुर्थ वर्षाचे गुणपत्रक सोबत जोडलेले आहे, याची खात्री करावी, तद्नंतरच परिपूर्ण प्रस्ताव शिफारशींसह संचालनालयास विहीत मुदतीत सादर करण्यात यावा. विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेले प्रस्ताव दप्तरी दाखल करण्यात येतील व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही, याची नोंद घेण्यात यावी.**

ix. विद्यार्थ्यांकडून थेट संचालनालयाकडे सादर अर्जाची दखल घेतली जाणार नाही. सदरहू अर्ज दप्तरी दाखल करण्यात येऊन त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही, याची नोंद घेण्यात यावी.

x. **महाविद्यालयाचे प्राचार्यांनी शासनाद्वारे कोविड-१९ बाबत वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या सुचना/ आदेश विचारात घेऊन विद्यार्थ्यांना ना-हरकत प्रमाणपत्र देणे, अर्ज सादर करणे, अर्जामधील त्रुटी कळविणे, संचालनालयास परिपुर्ण प्रस्ताव सादर करणे इत्यादी बाबतची कार्यवाही ईमेलद्वारे करण्यात यावी. तसेच महाविद्यालयाचा ईमेल आयडी हा महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात यावा. कोणत्याही परिस्थितीमध्ये शासनाद्वारे कोविड-१९ बाबत वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या सुचना/ आदेश याचा भंग होणार नाही याबाबत दक्षता घेण्यात यावी.**

संदर्भ क्र. ३ येथील विनियमातील तरतुदी / नियम स्पष्ट असून याबाबतची कार्यवाही करताना नियम तथा तरतुदींचे उल्लंघन झाल्यास त्या-त्या स्तरावरील प्राधिकारी यांना व्यक्तीश: जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**( डॉ. धनराज माने )**
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रत माहितीस्तव सविनय सादर -

मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, ८ वा मजला, न्यु एक्सेलसिअर इमारत, ए. के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी -

१. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
   २/- त्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त सूचना त्यांच्या कार्यक्षेत्रातील विधी महाविद्यालयांना आपल्या स्तरावरुन कळविण्यात याव्यात.
२. प्राचार्य, सर्व विधी महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.
३. सांख्यिकी अधिकारी प्रस्तुत कार्यालय
   २/- सदरहू परिपत्रक संचालनालयाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.
४. निवड नस्ती.

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१.**
Web:www.dhepune.gov.in E-mail : law.dhepune@nic.in

---

## पहिल्या वर्षानंतर संस्था / महाविद्यालय बदलासाठी वेळापत्रक

| अ.क्र. | तपशिल | कालावधी |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्यांना ज्या महाविद्यालयामध्ये बदलीने प्रवेश घ्यायचा आहे त्या ठिकाणी सहपत्रांसह (ना-हरकत प्रमाणपत्र, गुणपत्रिका इ.) ईमेलद्वारे/प्रत्यक्ष अर्ज सादर करणे. | दिनांक २४.०९.२०२१ ते दिनांक २९.०९.२०२१. |
| २ | महाविद्यालयांनी त्यांच्याकडे प्राप्त अर्जाची तपासणी करुन यादी व प्रस्ताव संचालनालयास सादर करणे. | दिनांक २९.०९.२०२१ ते दिनांक ०१.१०.२०२१. |
| ३ | संचालनालय स्तरावर गठीत समितीमार्फत महाविद्यालय बदलण्यासाठी आलेल्या प्रस्तावाची पडताळणी. | दिनांक ०४.१०.२०२१ ते दिनांक ०८.१०.२०२१. |
| ४ | महाविद्यालय बदलण्यासाठी संचालनालय स्तरावरुन परवानगी देण्यात आलेल्या व परवानगी नाकारलेल्या विद्यार्थ्यांची यादी महाविद्यालयाला कळविणे. | दिनांक ११.१०.२०२१ सायं ०५.०० पर्यंत. |

महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे अर्ज सहपत्रांसह, महाविद्यालयाची शिफारस व Annexure B & C मधील माहिती संचालनालयास दिनांक ०१.१०.२०२१ रोजी कार्यालयीन वेळेमध्ये पोहचतील अशा पध्दतीने पाठवावेत (शक्यतो हस्तपोच करण्यात यावेत), दिनांक ०१.१०.२०२१ नंतर प्राप्त झालेल्या प्रस्तावांचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

******

# ANNEXURE - A

## APPLICATION FOR CHANGE OF INSTITUTION AFTER 1st Year

1. Name of the Student ( In Full) :
2. Name of the Course :
3. Academic year of Admission in the : Present Institute :
4. Academic year in which seeking Transfer :
5. Whether Admission is under Supernumerary quota (Yes/ No) :
6. Address for correspondence with : Mobile No. & Email ID :
:
:
7. Name of the Present Institute :____________________________
:____________________________
8. Course of Study Details :
9. Details of the Result of the last exam.

| Course | Year / Semester | Year of Passing | Summer / Winter | No. of Attempt | Percentage | University |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |

10. Details of backlog subject ( if any) :
11. Name of aspiring institute where Admission by transfer is sought : ____________________________
____________________________
12. Name of the University to which above : College is affiliated :
13. Branch & year / semester and university : in which admission by transfer is sought :
14. Reasons for asking the transfer of : Institute / Change of University :

I the undersigned state on solemn declaration that the information stated above is true to my knowledge and belief. I am fully aware that transfer / change of institute / branch is not a right and it is up to the authority to decide my case on the basis of merit.

**Date :** **(** Name & Signature of the Student **)**

( पृष्ठ ८ पैकी ६ )

# Annexure - B

## Statement Showing the list of Candidate applied for change of Institute after 1rst Year

**Name of the College :**

**Name of the Course :**

**Name of the University to which college is affiliated:**

| Sr. No. | Name of the Students | Name of the Current Institute | Year and Course | Whether Admission is under Supernumerary quota ( Y/N) | Total Marks obtained out of | % of Marks | Details of backlog subject ( if any) | Name of the aspiring Institute | Reason for Transfer | Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | / | | | | | |
| | | | | | / | | | | | |
| | | | | | / | | | | | |

Date : / / Seal of the College / Institute Signature of Principal

( Note - Kindly submit Annexure - B Course wise Separately )

Annexure - C

## Statement Showing Vacancy Position for Academic Year 2021-22

**Name of the College :**

**Name of the Course :**

**Name of the University to which college is affiliated:**

| Sr. No | Name of Course | Year | Sanctioned Intake 2021-22 or respective year of 1st year* | Students admitted A.Y. 2021-22 ( as per Col. 4 ) | Vacancy ( Col. 4-5) | Student in pipeline (Backlog passed students) | Students Shifted due to change of college | Net Vacancy available [ (6)-(7+8)] |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| | | Second | | | | | | |
| | | Third | | | | | | |
| | | Fourth | | | | | | |
| | | Final | | | | | | |
| | | | | | | | | |

Date : / / Seal of the College / Institute Signature of Principal

( Note - Kindly submit Annexure - C Course wise Separately )

* Sanctioned intake - As per Government / University.

( पृष्ठ ८ पैकी ८ )